।।श्री।।

# प्रस्तावना

## ।। श्रीज्ञानदेवांचा हरिपाठ ।।

(एक अभ्यास)

श्रीसंत ज्ञानदेवांच्या प्रसिद्ध रचनांपैकी हरिपाठ ही एक सुटसुटीत व अत्यंत भक्तप्रिय रचना आहे. वारकऱ्यांच्या दैनंदिन उपासनेचा ती अविभाज्य घटक आहे. श्रीज्ञानदेवांनी जाणीवपूर्वक ह्या स्वतंत्र ग्रंथाची रचना केली असल्याने त्यात आध्यात्मिक ग्रंथरचनेची मूल्ये स्पष्ट किंवा अस्पष्टपणे दिसतात. 'तेन वयं भगवन्तः स्याम' ह्या ऋग्वेदीय अपेक्षेप्रमाणे हरिपाठही हरिरूप होण्यास प्रवृत्त करून तसे मार्गदर्शनही करतो.

हरी ह्या शब्दाचे सुमारे पंचवीस अर्थ असून ते अत्यंत भिन्न आहेत. विष्णू, सूर्य, अग्नी, राम, सिंह, सर्प, मोर इ. प्रातिनिधिक अर्थ असून 'हरिवासर' म्हणजे एकादशी हाही एक अर्थ आहे. हरिपाठातील हरी मात्र 'हरण करतो तो' ह्या अर्थाचा असून, अज्ञान व दुःख ह्यांचे हरण करणारा आत्मा तोच हरी. 'किं हरति' ह्या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे. 'ज्ञानरूपत्वेन अज्ञानं हरति' व 'सुखरूपत्वेन दुःखं हरति' अशी ती उत्तरे आहेत. 'एक हरी आत्मा' हे हरिपाठातील सूत्र व 'आत्मा चिदानंदरूप आहे' हे शास्त्र वरील अर्थ सांगते. 'मी हरी आहे' असा अनुभव येताच अज्ञान व दुःखाचे हरण होते.

'हरिपाठ' म्हणजे हरी ह्या नामाचा उच्चार होय. हरिस्मरण, हरिप्रेम, हरिचिंतन इ. हरिपाठाचे कृतिभेदानुसार भिन्न अर्थ आहेत. हरिजप (अभंग-४) हाही हरिपाठ असून प्रत्यक्ष हरिपाठ हा शब्द एकवीस, सत्तावीस इ. अभंगांत आहे. हरिनाम, हरिनेम अशाही शब्दयोजना दिसतात.

वैकुंठ, रामकृष्ण, विष्णू, केशीराज, नारायण, राम, लक्ष्मीवल्लभ, भगवंत, गोविंद व कृष्ण ही नामे 'हरि' ह्या अर्थाने हरिपाठात वापरली आहेत. त्यामुळे हरिपाठातही हरी ह्या नामाचा आग्रह नाही हे स्पष्ट दिसते.

हे सर्वच हरण करतात.

'तुम्ही असे करा' असे आज्ञार्थक अभंग तीन असून बाकी सर्व विध्यर्थक, अनुभव कथनात्मक, आश्वासक इ. प्रकारचे आहेत. 'पळे भूतबाधा' हे भित्र्यांना आश्वासन, 'दिधले संपूर्ण माझे हाती' (११) हे अनुभव कथन, 'भावबळे आकळे' (१२) हा विध्यर्थ होय. 'हरि मुखे म्हणा' ही आज्ञा आहे. 'मागिलीया जन्मा मुक्त झालो' असा संतांच्या मुखातून क्वचित येणारा आश्वासक अनुभव (१५) हरिपाठात आहे. 'पारियाचा रवा घेता भूमीवरी' असे अत्यंत समर्पक दृष्टान्त आहेत.

'वाचेशी सद्गद' ह्या शब्दात हरिपाठाचा प्रेम हा स्थायीभाव व्यक्त झाला आहे. 'टाहो फोडी' हा प्रेमळ आर्ततेचा आविष्कार आहे. 'गुजेविण हित' ह्या शब्दयोजनेत प्रेमाने गुजगोष्टी सांगणारे श्रीगुरू अभिप्रेत आहेत. 'हरिसी करुणा येईल तुझी' ह्यात हरिप्रेम व्यक्त झाले आहे. 'त्रिगुण असार निर्गुण हे सार', 'आत्मा जीव शिव समा', 'नुरोनिया ठेला', 'अद्वैत वाटा नेणे तो उपजोनि करंटा', 'लटिका व्यवहार सर्व हा संसार' इत्यादी प्रकारे अद्वैत वेदान्तशास्त्र सांगितले गेले आहे. सगुण साकार श्रीहरी हा हरिपाठाचा आलंबन विभाव असून त्याच्या आधारानेच नाम, प्रेम, करुणा इत्यादी राहतात. हरीचे नाम हा उद्दीपन विभाव असून नामाच्या स्मरणाबरोबर हरीविषयी सर्व भाव जागे होतात. 'ठायीच मुराला अनुभव' हा अनुभव आहे. ही पारमार्थिक अनुभवाची परिसीमा आहे.

हरिपाठाच्या अनुबंधाचा विचारही शास्त्राच्या चौकटीत नेटकेपणाने बसतो. 'असुनी संसारी' हा हरिपाठाचा अधिकारी आहे. खास त्याच्यासाठी ह्या ग्रंथाची रचना आहे. शास्त्रानुसार संन्यास न घेताही, मोक्षलाभाची त्यात क्रमाने व्यवस्था आहे. मोक्ष हा हरिपाठाचा विषयच आहे. सर्व साधनमार्ग मोक्षाच्या दिशेने आहेत. ग्रंथ व अभ्यासक ह्यांचा वाच्यवाचक संबंध असून मोक्ष व अधिकारी ह्यांचा प्राप्यप्रापक संबंध आहे. प्रयोजन म्हणजे फळ. 'ज्ञानदेवा फळ नारायण पाठ' ह्या अभंगात ते व्यक्त झाले आहे. 'तेणें मुक्ति चारी साधियेल्या' (१) हा हरिपाठाचा उपक्रम असून 'उच्चारणीं पाही मोक्ष

सदा' (२५) हा उपसंहार आहे व त्यांची एकवाक्यता आहे. 'हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा' हे हरिपाठाचे अभ्यासलिंग आहे. 'करतळीं आवळे तैसा हरि' ह्या शब्दांत अपूर्वतालिंग प्रगट झाले आहे. हरीचा प्रत्यक्ष व स्पष्ट अनुभव त्यांत व्यक्त होतो. 'यमें कुळगोत्र वर्जियेले' हे अर्थवादलिंग आहे. ह्यात यम गौण असून कुळगोत्राचा उल्लेख स्तुतिपर आहे. मोक्ष मुख्य आहे. मुख्य विषय समजावून सांगण्यासाठी जी युक्ती वापरली जाते तिला उपपत्तीलिंग असे म्हणतात. 'एक हरि आत्मा जीव शिव समा' ह्या अभंगात हरी हे तत्त्व जीव-शिवात समानत्वाने व्यापून आहे हे युक्तीने समजाविले आहे. त्यामुळे अनुक्रमे अविद्या व माया ह्यांचा नामसमाधीत निरास होताच ब्रह्मरूप हरी उरतो. त्वंपद वाच्य इ. खटपटी कराव्या लागत नाहीत.

हरिपाठाची रचना बऱ्याच ठिकाणी संदिग्ध आहे. त्यामुळे त्या रचनेत काही शब्द मिळविल्याशिवाय अर्थबोध होत नाही. उदा. - 'जेथोनि चराचर हरिसी भजे' (२) येथे 'जेथोनि चराचर प्रगटे त्या हरीसी तू भजे' अशी तीन पदे अधिक घ्यावी लागतात. तसेच 'सारासार विचार हरिपाठ' (३) येथेही सार व असार ह्या विचारात हरिपाठ हा साररूप आहे असे लावून घ्यावे लागते. काही ठिकाणी अनुप्रासासाठी अभंगातील शब्द मागे पुढे केलेले आहेत. उदा. 'सगुण निर्गुण गुणाचे अगुण। हरिवीण मन व्यर्थ जाय।' (३) येथे 'सगुण व निर्गुण गुणाचे आहे. हरीवाचून मन व्यर्थ जाते' असा अर्थ लावून घ्यावा लागतो. त्रिगुण व निर्गुण निरपेक्ष 'अगुण' हा शब्द ज्ञानदेवांनी नव्याने स्वीकारला आहे.

काही करावे व काही कळावे ह्या दोन सहज मानवी प्रवृत्तींप्रमाणेंच कोणाच्या आधाराने राहावे, कोणाची स्तुती करावी, कोणाच्या संगतीत राहावे, कोणाजवळ मन मोकळे करावे, कौतुक करावे, वाचावे, सांगावे, काही मागावे ह्याही सहज मानवी प्रवृत्ती आहेत. ह्या सर्वांचा उपासनेत समावेश होतो. ह्या प्रवृत्तींचे शास्त्रशुद्ध उन्नयन करून उपासकाला मोक्षापर्यंत न्यावे हे भक्तिशास्त्राचे उद्दिष्ट आहे. हरिपाठात भक्तीचे शास्त्र स्पष्ट केले आहे. वरील सर्व प्रवृत्तींपेक्षा स्मरण करणे ही प्रवृत्ती अधिक बलवान आहे.

हरिपाठात हरीच्या उच्चाराने त्याचा बुद्धीवर सतत संस्कार करून पुढे त्या संस्काराचा सहज परिणाम म्हणून स्मरण व्हावे अशी व्यवस्था आहे. मोक्ष ही उन्नत जीवनाची परिसीमा आहे. तो हरिपाठाचा विषय व फळ आहे.

प्रेम हा हरिपाठाचा म्हणजे भक्तीचा स्थायीभाव आहे. एका जीवाला दुसऱ्या जीवाविषयी वाटणारे प्रेम स्वार्थातून उत्पन्न होते हे विधान धक्कादायक व अप्रिय असले तरी सत्य आहे. अनुकूलाने प्रेम, प्रतिकूलाने द्वेष, अनुकूलाचे प्रतिकूल होताच द्वेष इ. प्रकार सर्वत्र असल्याने त्यावर भाष्य करण्याची जरूर नाही. पण हरीवरील प्रेम ह्या जातीचे असता कामा नये. हरी हा वर वर विचार केला तरच अनुकूल किंवा प्रतिकूल वाटतो. असा विचार करणारा स्वत:च हरिरूप असल्याने त्या विचाराला काही अर्थ नाही. ह्यासाठी हरीला पूर्ण शरणागत असावे लागते. शरणागतीत अनुकूल व प्रतिकूल भावांना (हरीविषयी) मुळीच वाव नाही. त्यामुळे भक्त व हरी ह्यांचा संबंध सतत प्रेममय राहतो. अशा प्रेममय संबंधात हरिपाठाचे यश सामावलेले आहे. जीवनातील यशापयश, मानापमान, लाभहानी इ. द्वंद्वांचा ब्रह्मरूप हरीशी संबंध जोडला तर हरिप्रेमाची भरती–ओहोटीच सतत चालू राहून कधीच हरिरूप होता येणार नाही. हे सर्व जग आपल्या स्वत:सह व सर्व संबंधितांसह हरिरूप ईश्वराच्या नियोजनानुसार व नियमांनुसार चालते हे सतत लक्षात ठेवले तरच ब्रह्मरूप हरीशी ऐक्य साधता येते.

संपूर्ण हरिपाठाचे अभंग, त्यांच्या अन्वयासह, आवश्यक तेथे ब्रह्मसूत्रांप्रमाणे अधिक शब्द वापरून व अभंगातील दंडाचे बंधन बाजूला सारून लिहिले तर त्यांचा जेवढा अर्थ स्पष्ट होईल तेवढा करू. काही संकल्पना जरूर तेथे थोडक्यात स्पष्ट करू.

डॉ. श्री. द. देशमुख.

* * *